# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in


क्रमांक : २/एनजीसी/मान्यता/२०११/२७८०

दिनांक : 1 मार्च MAR 2011

प्रति,

प्राचार्य,

गुरुनानक एज्युकेशन सोसायटीचे

गुरुनानक इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड

टेक्नॉलॉजी, खासरा नं.९४,९५, व १६४/१,

मौझा दहेगाव, फेज नं.२६,

ता.कळमेश्वर, जि.नागपूर – ४४० ००१.

**( Institute Code 4134)**

**AICTE App. No. (1- 3882211)**

**विषय** : शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून विना-अनुदान तत्वावर अभ्यासक्रम सुरु करण्यास व सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत बदल करण्यास परवानगी देण्याबाबत.

**संदर्भ** : शासन निर्णय क्रमांक- टिईएम-२००९/(१०३/०९)/तांशि-४, दिनांक १५ जून, २००९.

उपरोक्त विषया संदर्भात आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून विना-अनुदान तत्वावर अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये खालील अभ्यासक्रम सुरु करण्यास व सुरु असलेल्या अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमतेत बदल करण्यास विहित अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| १. | कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरींग | ६०-९० |
| २. | इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग | ००-६० |
| ३. | एमबीए | ००-६० |

सदर अटींपैकी आपण शासन निर्णयात नमूद केलेल्या अटींचे पालन करण्याचे नोंदणीकृत हमीपत्र या संचालनालयास सादर केले आहे.

विहित केलेल्या अटींपैकी उरलेल्या खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून विना अनुदान तत्वावर अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास / सुरु असलेल्या अभ्यासक्रमांच्या प्रवेश क्षमतेत बदल करण्यास व विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून अंतिम परवानगी देण्यात येत आहे.

१. सदर मंजूरी कायम विना-अनुदान तत्वावर राहील. सदर अभ्यासक्रमासाठी शासनाकडून आवर्ती व अनावर्ती अनुदान कोणत्याही परिस्थितीत व कोणत्याही कारणास्तव मंजूर केले जाणार नाही.

२. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र.टिईएम-३३८२/१११८३६/(१९०)/तांशि-१, दि. २१ मे, १९८३ अनवये विना-अनुदान तंत्रशिक्षण संस्थांना शासनाने विहित केलेल्या अटीव शर्ती आपणास बंधनकारक असतील.

३. संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद कर्मचारी नेमावे व शासन व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांच्या नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचा-यांना देण्यात यावे. शिक्षक व इतर कर्मचा-यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून या संचालनालयाकळ डे तक्रारी आल्यास किंवा न्यायालयीन प्रकरण उद्‌भवल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल व होणा-या परिणामास सर्वस्वी संस्था जबाबदार राहिल.

४. शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून विना अनुदान तत्वावर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास नियतठेव म्हणून **रु.७.०० लाख, इलाहाबाद बँक, शाखा – गांधीबाग, नागपूर, पावती क्र. ०३९४०८ दि.१८/०१/२०११,** अन्वये संस्थेचे सचिव व संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात ५ वर्षासाठी जमा केलेले आहेत.

५. आपल्या संस्थेला महाराष्ट्र शासन, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई शिक्षण शुल्क समिती, प्रवेश नियंत्रण समिती, मुंबई व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडून वेळोवेळी विहीत करण्यात आलेले प्रवेश नियम, आरक्षण, शिक्षणशुल्क व इतर शुल्क या संबंधीच्या निर्णयाचे पालन करणे बंधनकारक राहील.